04 DEC 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना संपत मोरे. यावेळी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, प्रकाश पवार, अशोक पवार, नंदकुमार मोरे आदी.

# नव्या पिढीसमोर प्रतिसरकारचा इतिहास मांडण्याची गरज : मोरे

## जी. डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

कोल्हापूर, ता. ३ : भारतीय स्वातंत्र्य अनेकांच्या त्यागातून साकारले आहे. स्वातंत्र्य चळवळीत प्रतिसरकारचे मोठे योगदान आहे. मराठी साहित्यातून प्रतिसरकारच्या इतिहासाचे प्रभावी चित्रण केले आहे. ते नव्या पिढीसमोर मांडण्याची गरज आहे, असे अभ्यासक संपत मोरे यांनी आज सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या जी. डी. (बापू) लाड अध्यासनातर्फे क्रांतिअग्रणी लाड यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात मोरे यांनी 'प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते.

मराठी साहित्यातून क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. (बापू) लाड, नागनाथअण्णा नायकवडी यांच्यासारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनातील प्रसंग साहित्यातून चित्रीत झाले आहेत. ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, वामन होवाळ, रा. तु. पाटील यांच्या साहित्यातील तसेच कथा, शाहिरी काव्य, कादंबरी, आत्मचरित्र यामधून आलेले प्रतिसरकार चळवळीचे चित्रण अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. याची दखल नव्या पिढीने घेतली पाहिजे, असे मोरे यांनी सांगितले.

### सांस्कृतिक परंपरेशी नाते

■ **महात्मा गांधीच्या विचारसरणीचा नवा अन्वयार्थ प्रतिसरकारच्या चळवळीने लावला. या चळवळीने सामाजिक सुधारणांचा प्रसार आणि प्रचार करण्याचा प्रयत्न केला. सांस्कृतिक परंपरेशी असणारे नाते प्रतिसरकारने कधीही तुटू दिले नसल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.**

अशोक पवार, प्रभंजन माने, नवनाथ गुंड, सी. एल. रोकडे, आर. एस. डुबल, प्रताप लाड, मतीन शेख उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

0 4 DEC 2025


तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारचा इतिहास युवा पिढीसमोर यावा

## संपत मोरे यांचे प्रतिपादन : जी. डी. (बापू) लाड जयंतीनिमित्त व्याख्यान

**मराठी साहित्यातून प्रतिसरकारच्या इतिहासाचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. प्रतिसरकारचा जाज्ज्वल्य इतिहास मराठी साहित्यातून प्रतिबिंबित झाला आहे. तो नव्या पिढीसमोर मांडण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन अभ्यासक संपत मोरे यांनी केले.**



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना संपत मोरे. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रकाश पवार, अशोक पवार, डॉ. नंदकुमार मोरे.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या जी. डी. (बापू) लाड अध्यासनाच्या वतीने जी.डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' यावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार होते.

मोरे म्हणाले, स्वातंत्र्य चळवळीत प्रतिसरकारचे मोठे योगदान आहे. मराठी साहित्यातून क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. (बापू) लाड, नागनाथअण्णा नायकवडी यांच्यासारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनातील प्रसंग साहित्यातून चित्रित झाले आहेत. ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, वामन होवाळ, रा. तु. पाटील यांच्या साहित्यातील तसेच कथा, शाहिरी काव्य, कादंबरी, आत्मचरित्रातून आलेले प्रतिसरकार चळवळीचे चित्रण महत्त्वपूर्ण आहे. याची दखल नव्या पिढीने घ्यावी, असे आवाहन केले.

डॉ. प्रकाश पवार यांचेही भाषण झाले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

यावेळी अशोक पवार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नवनाथ गुंड, प्रा. सी. एल. रोकडे, मतिन शेख, प्राचार्य आर. एस. डुबल, प्रा. प्रताप लाड तसेच इतिहास विभाग, राज्यशास्त्र विभाग, मराठी विभागातील संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

04 DEC 2025

जनप्रवास

# युवा वैज्ञानिक परिषदेसाठी डॉ. क्रांतीवीर मोरे यांची निवड

- पंचकुला येथे होणार इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल

जनप्रवास : कोल्हापूर

हरियाणातील पंचकुला येथे ६ ते ९ डिसेंबर या कालावधीत आयोजित इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल-२०२५ मधील युवा वैज्ञानिक परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. क्रांतीवीर मोरे यांची निवड झाली आहे.



डॉ. क्रांतिवीर मोरे सौरऊर्जा क्षेत्राच्या अनुषंगाने संशोधन करीत आहेत. त्यांनी विविध प्रकारची नॅनोसंमिश्रे तयार केली असून त्यांच्यापासून कमीत कमी तापमानामध्ये आणि अत्यल्प वेळेत सौरऊर्जा उत्पादन करणारे उपकरण बनविले आहे. यामध्ये त्यांनी कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईड नॅनोमुलद्रव्यांचा वापर केला आहे. हे उपकरण सुलभपणे हाताळता येते. सौरऊर्जा क्षेत्रातील संशोधनाला चालना देणाऱ्या या संशोधनामुळेच डॉ. मोरे यांची या परिषदेसाठी निवड झाली आहे. डॉ. मोरे यांचे वीसहून अधिक आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. सहा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पेटंट त्यांच्या नावावर आहेत. इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हलचे घोषवाक्य "आत्मनिर्भर भारतः विज्ञानातून समृद्धीकडे" असे असून देशातील वैज्ञानिक नवप्रतिभा, सर्जनशीलता यांना एकत्र आणून आंतरविद्याशाखीय संवाद आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहित करण्याचे उद्दिष्ट आहे. नुकतेच त्यांना भारत सरकारकडून कॉपीराईटदेखील प्राप्त झाला आहे.

0 4 DEC 2025
लोकमत

# क्विक Update

## क्रांतिवीर मोरे यांची निवड



**कोल्हापूर :** हरियाणातील पंचकुला येथे ६ ते ९ डिसेंबर या कालावधीत आयोजित इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल -२०२५ मधील युवा वैज्ञानिक परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. क्रांतिवीर मोरे यांची निवड झाली. ते सौरऊर्जा क्षेत्राच्या अनुषंगाने संशोधन करत आहेत. त्यांनी नॅनो संमिश्रे तयार केली असून त्यांच्यापासून कमीत कमी तापमानामध्ये आणि अत्यल्प वेळेत सौरऊर्जा उत्पादन करणारे उपकरण बनविले आहे.

04 DEC 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कारवाई वाढली, 'कॉपी' घटली

## विद्यापीठाच्या भरारी पथकांचा धाक; गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांना दणका

**कोरोनाच्या कालावधीत दीड वर्षे परीक्षा ऑनलाईन झाल्या. त्यामध्ये कॉपी (गैरमार्गाचा अवलंब) करण्याचा प्रकार वाढला. त्याला आळा घालून कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने भरारी आणि बैठी पथके परीक्षा केंद्रांवर तैनात केली. त्यांच्या कारवाईचा धाक निर्माण झाला असून, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांतील 'कॉपी'ची प्रकरणे यंदा घटली आहेत. दोन वर्षांपूर्वी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने पहिल्यांदा हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी प्रायोगिक तत्त्वावर कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्रांवर बैठे पथक तैनात केले. त्याबरोबरच भरारी पथकेही कार्यान्वित ठेवली. या पथकांनी धडक कारवाई केली. त्यामुळे 'कॉपी' करणाऱ्यांचे प्रमाण सरासरी ४० टक्क्यांनी घटले आहे. कॉपीमुक्त परीक्षेच्या दिशेने वेगाने जाण्यासाठी परीक्षा मंडळाला पावले उचलावी लागणार आहेत.**

### कोल्हापुरात सापडले सर्वाधिक विद्यार्थी

या भरारी आणि बैठे पथकांनी गेल्या तीन वर्षांत ४ हजार ३६२ विद्यार्थ्यांना परीक्षेत 'कॉपी' करताना पकडले आहे. त्यात सर्वाधिक २ हजार २५८ विद्यार्थी कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. त्यापाठोपाठ सातारा जिल्ह्याचे १ हजार १११ आणि सांगली जिल्ह्यातील ९९३ विद्यार्थ्यांची संख्या आहे.

डेटा रिसर्च

**- संतोष मिठारी**

### वर्षनिहाय 'कॉपी' प्रकरणांची आकडेवारी




### गेल्या तीन वर्षांतील 'कॉपी' प्रकरणे

| | |
|---|---|
| कोल्हापूर | २२५८ |
| सांगली | ९९३ |
| सातारा | ११११ |
| एकूण | ४३६२ |

### दृष्टिक्षेपात परीक्षा

| | |
|---|---|
| एका सत्रातील परीक्षांची संख्या | ८५७ |
| परीक्षा देणारे विद्यार्थी | २ लाख ५० हजार |
| परीक्षा केंद्रे | २९० |
| प्रत्येक जिल्ह्यासाठीची भरारी पथके | प्रत्येकी ३ |
| बैठी पथके असलेली केंद्रे | १५ |

### परीक्षा प्रमाद समितीच्या चौकशीनंतर झालेली कारवाई

| शिक्षेचा प्रकार | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| कॉपी करताना कारवाई झालेले एकूण विद्यार्थी | ६४८ |
| कॉपी करताना सापडलेल्या विषयाची संपादणूक (मिळालेले गुण) रद्द | ४३५ |
| संबंधित विषयाची संपादणूकरद्द आणि ५०० रुपये दंड | ११३ |
| संबंधित परीक्षेची संपादणूक रद्द | ४७ |
| परीक्षेची संपादणूक रद्दसह पुढील तीन परीक्षेस बसण्यास प्रतिबंध | २० |
| परीक्षेची संपादणूक रद्दसह पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध | १६ |
| परीक्षेची संपादणूक रद्द आणि पुढील दोन परीक्षेस बसण्यास प्रतिबंध | १० |
| निकाल राखीव ठेवणे | ०५ |
| विषयाची संपादणूक रद्द आणि १००० रुपये दंड | ०१ |
| परीक्षेची संपादणूक रद्द आणि ५०० रुपये दंड | ०१ |

" विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षेत 'कॉपी'ची प्रकरणे वाढली होती. त्याला रोखण्यासाठी दोन वर्षांपूर्वी विद्यापीठाने कॉपीमुक्त अभियान सुरू केले. त्यात पहिल्यांदा हिवाळी सत्रात प्रायोगिक तत्त्वावर बैठे पथके १८ केंद्रांवर तैनात केली. या आणि भरारी पथकाच्या कारवाईने वर्षागणिक कॉपी करताना सापडणाऱ्यांचे आणि त्यांच्यावरील कारवाईचे प्रमाण वाढले. या कारवाईचा धाक निर्माण झाल्याने कॉपी करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. पूर्ण परीक्षा कॉपीमुक्त करण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्यात महाविद्यालयपातळीवर एखादे पथक तयार करण्याचा विचार सुरू आहे.

**- डॉ. अजितसिंह जाधव,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ